# महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी, नाशिक - ४२२ ००४.

*****************************************************************************

## परिपत्रक

**विषय:- स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक पदावर सामावून घेण्यासाठी अर्हताकारी / विभागीय परीक्षा सन २००९.**

**संदर्भ:-** १. सा.बा.वि. मंत्रालय, मुंबई यांची अधिसूचना - सा.बा.विभागातील स्था.अ.स. गट-क (सेवाप्रवेश) नियम १९९८ दिनांक १८/६/१९९८ आणि परीक्षा नियमावली शासन निर्णय क्र. इएक्सएम-१०९९/६८/आस्था-२ दिनांक १०/८/२००१.

२. जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई यांची अधिसूचना - पाटबंधारे विभागातील स्था.अ.स. गट-क (सेवाप्रवेश) नियम २००२ दिनाक २६/२/२००२ आणि परीक्षा नियमावली शासन निर्णय क्र. इएक्सएम-१००२/(२/२००२)/आस्थापना (प्रशिक्षण) दिनांक १९/९/२००२.

१. संदर्भीय अधिसूचना व परीक्षा नियमावलीमधील तरतूदीनुसार व प्रचलित अभ्यासक्रमानुसार जलसंपदा (पाटबंधारे) विभाग व सार्वजनीक बांधकाम विभागातील स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक या पदाकरीता व या पदावरील कर्मचारी यांचेकरीता, महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी नाशिक हया कार्यालयामार्फत दिनांक २३/११/२००९ ते २८/११/२००९ या कालावधीत सन २००९ मधील अर्हताकारी / विभागीय परीक्षा घेण्यात येणार आहे. **(सदरचे परिपत्रक, प्रवेश अर्जासंबंधीच्या सूचना व प्रवेश अर्ज नमुना इ.माहिती प्रबोधिनीच्या www.wresc.org या website वर उपलब्ध आहे. सन २००९ वर्षापूर्वीच्या प्रवेश अर्जाचा नमूना ग्राहय धरला जाणार नाही व असे जूने प्रवेशअर्ज नाकारण्यात येतील प्रवेश अर्जाच्या नमुन्यात किरकोळ बदल केले असल्याने जुना नमुना ग्राहय धरला जाणार नाही. परीक्षार्थींनी प्रवेश अर्ज सुधारीत नमुन्यातच करावा)**

२. ही परीक्षा जलसंपदा विभाग (पाटबंधारे विभाग) व सार्वजनिक बांधकाम विभागातील स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक यांचेकरीता प्रचलित शासकीय नियमानुसार अर्हताकारी / विभागीय परीक्षा आहे. प्रचलित नियमात जर काही बदल झाल्यास सुधारित नियमाप्रमाणे प्रवेश दिला जाईल.

३. **संदर्भ (१) व (२) मधील स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक परीक्षा नियमावलीतील "परिक्षेला बसण्याची पात्रता":**

(अ) सार्वजनीक बांधकाम / पाटबंधारे विभागामध्ये काम करीत असलेला जो स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक या संवर्गामध्ये थेट सामावून घेतला जाण्यास पात्र नाही **किंवा**

(ब) स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक या संवर्गात सार्वजनीक बांधकाम विभाग स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक (सेवाप्रवेश) नियम १९९८ व पाटबंधारे विभाग स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक (सेवाप्रवेश) नियम २००२ मधील नियम ३ ब नुसार नामनिर्देशानुसार नियुक्त केलेले स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक **किंवा**

(क) नियम-५ अनुसार ज्याने पाच महीन्याचे विभागीय प्रशिक्षण पूर्ण केले आहे असा कर्मचारी वा स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक.

**<u>टीप:-</u> ज्या कर्मचा-यांनी सन १९९४ नंतर पांच महिन्यांचे प्रशिक्षण पूर्ण केलेले आहे किंवा सन १९९० ते १९९४ या कालावधीत ५ महिन्यांचे प्रशिक्षण अधिक १५ दिवसाचे उजळणी प्रशिक्षण घेतलेले आहे असे कर्मचारी सदर परीक्षेस बसण्यास पात्र राहतील.**

४. परीक्षेचा कालावधी साधारणपणे परीच्छेद १ मध्ये दर्शविल्याप्रमाणेच असेल. मात्र सार्वजनिक सुट्टी व इतर अनपेक्षीत बाबींमुळे बदल झाल्यास त्यांत फेरफार होण्याची शक्यता राहील.

५. इच्छुक उमेदवारांनी प्रवेशासाठी नमुना अर्ज, सूचना व प्रवेश पत्र इत्यादिचा छापील / झेरॉक्स नमुना परस्पर संबंधित नियंत्रक अधिका-यांकडून (अधीक्षक अभियंता / नियंत्रक अधिकारी / प्रशासक ) मागवून घ्यावा किंवा प्रबोधिनीच्या www.wresc.org या संकेतस्थळावरुन Down load करुन घ्यावा. नियंत्रक अधिकारी (अधीक्षक अभियंता / प्रशासक ) यांना विनंती करण्यांत येते की, या प्रबोधिनीच्या संकेत स्थळावरुन (website) नमुना अर्ज, सूचना व प्रवेश पत्र इत्यादिच्या झेरॉक्स करुन त्याच्या प्रती संबंधित परीक्षार्थीना त्यांचे मागणीनुसार परस्पर द्याव्यात. परीक्षार्थीने प्रवेश अर्ज दोन प्रतीत भरुन दिनांक ९/१०/२००९ पूर्वी आपल्या मंडळ कार्यालयास पोहोचतील अशारितीने संबंधित क्षेत्रिय अधिकारी / कार्यकारी अभियंता यांचेमार्फत सादर करणे आवश्यक आहे

६. परीक्षार्थीचे सदरचे अर्ज त्यांचे नियंत्रक अधिकारी (संबंधीत अधीक्षक अभियंता) यांना प्राप्त झाल्यानंतर तो परीक्षार्थी परीक्षेस बसण्यास पात्र आहे किंवा कसे याची तपासणी नियंत्रक अधिका-यांनी करावयाची आहे.

**मागील पानावरुन ..**

नियंत्रक अधिका-यांनी त्यांचेकडे मुदतीत प्राप्त झालेल्या सर्व अर्जाची तपासणी करुन त्यातील जे उमेदवार पात्र ठरतील त्यांची यादी व परीक्षार्थीनी सादर केलेल्या प्रवेश अर्जाची एक प्रत प्रबोधिनीकडे दिनांक ३/११/२००९ पर्यंत पाठविण्यात यावी व एक प्रत अभिलेख्यासाठी आपल्याकडे ठेवण्यात यावी.

दि. ३/११/२००९ नंतर प्राप्त होणारे सर्व अर्ज अपात्र करण्यात येतील व अर्ज उशीरा प्राप्त झाल्याबद्दल हे कार्यालय जबाबदार रहाणार नाही. नियंत्रक अधिका-यांनी त्याचे कार्यालयातील अर्ज पोष्टाने पाठवावयाचे असल्यास पुरेसा कालावधी देऊन पाठवावेत किंवा विशेष दूताकरवी पाठवावेत.

**सोबत:**
१. परिपत्रक
२. सूचनापत्रक.
२. प्रवेश अर्जाचा नमुना.
३. प्रवेशपत्र नमुना.
४. परीक्षेचे वेळापत्रक.

} इत्यादि माहीती संकेतस्थळावरुन प्राप्त करुन घ्यावी.

जा.क्र.मअप्रप्रा/स्थाअस/अप-विप//प्रवेश अर्ज/१७९२/सन २००९
महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी
दिंडोरी रोड, नाशिक ४२२ ००४.
दिनांक: २१/०८/२००९.

(प्र. रा. भामरे)
**मुख्य अभियंता व संचालक**
महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी
नाशिक.

**प्रत -** मा. सचिव (जलसंपदा) जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर.

**प्रत -** मा.सचिव (ला.क्षे.वि.), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीसाठी सवियन सादर.

**प्रत -** मा.सचिव,(सा.बां./रस्ते) सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीसाठी सवियन सादर.

**प्रत-** मा. महासंचालक, संकल्पन, प्रशिक्षण, संशोधन महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, दिंडोरी रोड, नाशिक यांना माहितीसाठी सविनय सादर.

प्रत - मा.कार्यकारी संचालक, ------------------------------------------ ----------------------------
यांना माहितीसाठी सविनय सादर.

**प्रत -** मुख्य अभियंता, -----------------------------------------------------------------------
जलसंपदा विभाग/ सार्वजनिक बांधकाम विभाग, यांना माहितीसाठी सस्नेह अग्रेषित.

**प्रत -** अधीक्षक अभियंता / अधीक्षक अभियंता व प्रशासक, ------------------------------------------
जलसंपदा विभाग / सार्वजनिक बांधकाम विभाग, यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित.

**प्रत -** नियंत्रक अधिकारी / अधीक्षक अभियंता -------------------------------------------------------
-
यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित.

**प्रत -** अधीक्षक अभियंता व सहसंचालक, महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी, नाशिक यांना माहितीसाठी.

**प्रत** - स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक धारिका सन २००९.

**प्रत -** सूचना फलक.

***********

# महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी, नाशिक.

## स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक पदावर सामावून घेण्यासाठी अर्हताकारी / विभागीय परीक्षा सन २००९

## परीक्षार्थींना प्रवेश अर्ज भरण्यासाठी सूचना

१) अर्ज भरण्यांस सुरवात करण्यापूर्वी खालील सुचना काळजीपूर्वक वाचा.

२) अ) सुचनेसोबत जोडलेल्या याच वर्षाच्या विहीत नमुन्यातील अर्ज करावा. त्याची टंकलिखीत अथवा झेरॉक्स कॉपी असावी. टंकलेखन अथवा झेरॉक्स A4 या आकाराच्या कागदावर करण्यांबाबत आवश्यक दक्षता घ्यावी.

ब) अपूर्ण माहिती भरलेला, असत्य किंवा चुकीची माहिती दिलेला अर्ज नामंजूर करण्यांत येईल.

क)अपूर्ण अथवा कोणतीही त्रुटी असलेला अर्ज पूर्ततेसाठी परत न पाठविता तो आपले मंडळ कार्यालयात दप्तरी दाखल करण्यात येईल व याबाबत कोणताही पत्रव्यवहार क्रण्यात येणार नाही.

३) विहित नमुन्यांतील सदर अर्ज परीक्षार्थींनी त्यांच्या नियंत्रक अधिका-यांकडे मूळ दोन प्रतीत विहित वेळेत सादर करावयाचा आहे. अर्जाचे सर्व भाग सुचनापत्रकानुसार काळजीपुर्वक भरण्यांत यावेत व ते व्यवस्थित भरलेले आहेत याबाबतची तपासणी संबंधित कर्मचा-यांनी व्यक्तिशः करावयाची आहे.

४) **परीक्षेला बसण्यासाठी पात्रता:**

(अ) सार्वजनीक बांधकाम / पाटबंधारे विभागामध्ये काम करीत असलेला जो स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक या संवर्गामध्ये थेट सामावून घेतला जाण्यास पात्र नाही असा कर्मचारी **किंवा**

(ब) स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक या संवर्गात सार्वजनीक बांधकाम विभाग स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक (सेवाप्रवेश) नियम १९९८ व पाटबंधारे विभाग स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक (सेवाप्रवेश) नियम २००२ मधील नियम ३ ब नुसार नामनिर्देशानुसार नियुक्त केलेले स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक **किंवा**

(क) नियम-५ अनुसार ज्याने पाच महीन्याचे विभागीय प्रशिक्षण पूर्ण केले आहे असा कर्मचारी वा स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक.

**टीप:- ज्या कर्मचा-यांनी सन १९९४ नंतर पांच महिन्यांचे प्रशिक्षण पूर्ण केलेले आहे किंवा सन १९९० ते १९९४ या कालावधीत ५ महिन्यांचे प्रशिक्षण अधिक १५ दिवसाचे उजळणी प्रशिक्षण घेतलेले आहे असे कर्मचारी सदर परीक्षेस बसण्यास पात्र राहतील.**

**५) सदर परीक्षेची केंद्रे व केंद्रांतर्गत जिल्हे खालील प्रमाणे आहेत. त्याप्रमाणे प्रवेश** अर्जातील **अ.क्र. १० ची माहिती** भरावी.

| केंद्राचे ठिकाण व केंद्रक्रमांक | केंद्रांतर्गत जिल्हे |
|---|---|
| **१) ठाणे (४०१)** | **ठाणे, मुंबई शहर, मुंबई उपनगर, रायगड, सिंधुदुर्ग, रत्नागिरी.** |
| **२) नाशिक (४०२)** | **नाशिक, धुळे, जळगांव, नंदुरबार, अहमदनगर.** |
| **३) पुणे (४०३)** | **पुणे, सातारा, कोल्हापूर, सांगली, सोलापूर.** |
| **४) औरंगाबाद (४०४)** | **औरंगाबाद, बीड, जालना, उस्मानाबाद, लातुर, नांदेड, परभणी,हिंगोली.** |
| **५) अमरावती (४०५)** | **अमरावती, बुलढाणा, अकोला, यवतमाळ, वाशिम.** |
| **६) नागपूर (४०६)** | **नागपूर, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, वर्धा** |

**सदरची परीक्षा केंद्रे अस्थायी स्वरुपाची असून परीक्षार्थीच्या प्राप्त संख्येनुसार त्यात योग्य तो बदल करण्यात येईल.**

६) परीक्षेला बसण्यासाठी अर्ज करुन, आसन क्रमांक मिळाल्यानंतर, परीक्षेला अनुपस्थित राहील्यास परीक्षेची संधी घेतली असे समजण्यांत येईल.

७) **परीक्षेसाठी अभ्यासक्रमामध्ये दिलेले सर्व विषय अनिवार्य आहेत. तथापि, प्रवेश अर्जातील अ.क्र. ७, ८ व ९ मधील माहिती भरतांना (परीक्षार्थी कांही विषयास सुट मिळण्यास पात्र असेल तर) आधीच्या निकाल पत्राची प्रमाणित सत्यप्रत अर्जासोबत जोडणे अनिवार्य आहे.**

८)	**परीक्षा नियमावली  सार्वजनीक बांधकाम विभाग नियम क्र.१३ व पाटबंधारे विभाग नियम क्र. १० नुसार ३ संधीमध्ये आणि पहिल्या परीक्षेच्या दिनांकापासून ४ वर्षाच्या कालावधीत कर्मचा-याने किंवा स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यकाने परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.**

**मागील पानावरुन ..**

९)	अर्जामधील सर्व माहिती ही बिनचूक व खरी असावी. अर्जदाराने दिलेली माहिती खोटी व दिशाभूल करणारी आहे, असे आढळून आल्यास, उमेदवार शिस्तभंगाची कारवाई  व परीक्षा उत्तीर्ण झाल्यामुळे मिळालेले फायदे गमावणे या दोन्ही बाबीस पात्र  ठरेल. व स्वतंत्र विभागीय चौकशीस पात्र ठरेल.

१०)	परीक्षा केंद्रावर वैयक्तिक किंवा सांघिक गोधळ घालणे व परीक्षेस बसलेल्या इतर परीक्षार्थींना प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरित्या त्रास होईल अशी वर्तणूक करणे, कॉपी करणे इ. कृत्ये शिस्तभंगाचे समजले जाईल.

११)	प्रबोधिनीने जाहीर केलेला निकाल हा अंतिम राहाणार आहे. तथापि निकाल जाहीर झाल्याच्या दिनांकापासून दोन महिन्यांच्या आंत गुणांच्या फेरमोजणीचा अर्ज नियंत्रक अधिकारी यांचेकडे अर्जदाराने करावयाचा आहे.

१२)	प्रवेश अर्जावर आणि परीक्षा प्रवेशपत्रावर दर्शविलेल्या ठिकाणी परीक्षार्थीने स्वतःचा पासपोर्ट आकाराचा फोटो चिकटविणे आवश्यक आहे. तसेंच सदर फोटो  ते ज्या कार्यालयात काम करत आहेत त्या कार्यालयाकडून स्वाक्षांकित करुन घेणे अनिवार्य आहे.  स्वाक्षांकीत करणा-या अधिका-याची अर्धी सही व अर्धा शिक्का छायाचित्रावर असणे बंधनकारक राहील.

१३)	प्रत्येक परीक्षार्थीने प्रवेश अर्जासोबत २२.५० x १० सें.मी. आकाराचे पाकीट स्वतःचे पुर्ण नांव, पत्ता, गावाचे नांव, तालुका, जिल्हा, पीनकोड क्रमांक, लिहून पाठवावे.  पाकीटास टपाल खात्याच्या प्रचलीत दरानुसार किमान रु. १०/- च्या किंमतीची आवश्यक तिकीटे लावण्यांत यावीत.

***********

## स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक पदावर सामावून घेण्यासाठी अर्हताकारी / विभागीय परीक्षा (सन २००९)

### प्रवेश अर्ज

महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी नाशिक कार्यालयाच्या उपयोगासाठी.

| | |
|---|---|
| मअप्रप्र दप्तरनोंदणी क्रमांक व दिनांक | |
| **आसन क्रमांक** | |

परीक्षार्थी / नियंत्रक अधिकारी यांनी माहीती भरणे अनिवार्य आहे.

| संधी | परीक्षेचे वर्ष | आसन क्रमांक |
|---|---|---|
| पहिली संधी | | |
| दुसरी संधी | | |
| तिसरी संधी | | |

==============================================================

### परीक्षार्थीचे विनंतीपत्र

पासपोर्ट आकाराचा फोटो चिकटवणे व का.अ. / अ.अ. यांनी साक्षांकित करणे अनिवार्य आहे.

.

प्रति,
मा.मुख्य अभियंता व संचालक
महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी
दिंडोरी रोड, नाशिक.

(नियंत्रक अधिकारी यांचे मार्फ़त सविनय सादर)

**विषय:-** दि. २३/११/२००९ ते २८/११/२००९ मध्ये घेतल्या जाणा-या स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक संवर्गात समाविष्ट होण्यासाठीची अर्हताकारी परीक्षा / विभागीय परीक्षा ..

मा. महोदय,

मी श्री./श्रीमती/कुमारी -------------------------------------------------------------- स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक पदासाठीच्या अर्हताकारी / विभागीय परीक्षेस प्रवेश मिळावा म्हणून सर्वत-हेने पूर्ण भरलेला विहित नमुन्यातील माझा अर्ज आपणाकडे योग्य मार्गाने सविनय सादर करीत आहे. यापूर्वी महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधीनी नाशिक मार्फत घेतल्या गेलेल्या स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक पदाच्या अर्हताकारी / विभागीय परीक्षेमध्ये -

(अ) एकही संधी घेतलेली नाही.

(ब) एक / दोन / तीन संधी घेतलेल्या आहेत.

मी स्थापत्य अभियांत्रिकी पदावर सामावून घेण्यासाठीच्या परीक्षेच्या अभ्यासक्रमाची व सेवाप्रवेश अणि परीक्षा नियमांची माहिती करुन घेतली आहे. प्रवेश अर्जामधील माहीती खोटी व दिशाभूल करणारी आहे असे आढळून आल्यास मी परीक्षार्थी उमेदवार शिस्तभंगाच्या कारवाईस, विभागीय चौकशीस आणि उत्तीर्ण झाल्यामुळे मिळालेले सेवालाभ गमविणे या दोन्ही बाबीस पात्र ठरेन याचीही नोंद घेतली आहे.

## परीक्षार्थीची / उमेदवाराची वैयक्तिक माहीती

१. **परीक्षार्थीचे नांव:** आडनाव पहिले नांव मधले नांव

______________________________________________

मराठी :

______________________________________________

इंग्रजी :

______________________________________________

२. **प्रथम नेमणूकीचे पदनाम:** नेमणूक आदेश क्र.
**व रुजू दिनांक**

३. **सध्याचे पदनाम :** नेमणूक आदेश क्र.
**व रुजू दिनांक**

**४. अ) उपविभाग :**

**ब) विभाग :**

**क) मंडळ :**

**५. परीक्षार्थीची शैक्षणिक पात्रता:** (प्रमाणपत्राच्या प्रति जोडणे आवश्यक आहे.)

| **अ.क्र.** | **परीक्षेचे नांव** | **परीक्षा मंडळाचे नांव** | **वर्ष** | **आसन क्र.** | **गुण/ टक्केवारी** | **शेरा** |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | तांत्रिक सहाय्यक | | | | | |
| २ | उपअवेक्षक | | | | | |
| ३ | सर्वेक्षक | | | | | |
| ४ | स्था.अ.स. | | | | | |
| ५ | पदविका / पदवी | | | | | |

**६.** (अ)शासनाने विहित केलेले पाच महिन्याचे विभागीय प्रशिक्षण पूर्ण केले आहे काय? होय/नाही/आवश्यक नाही
(प्रशिक्षण प्रमाणपत्राची प्रत जोडावी)

(ब)शासनाने विहीत केलेले १५ दिवसाचे उजळणी प्रशिक्षण पूर्ण केले आहे काय? होय/नाही/आवश्यक नाही
**(प्रशिक्षण प्रमाणपत्राची प्रत जोडावी)**

**७. यापूर्वी म.अ.प्र.प्र. तर्फे घेतल्या गेलेल्या परीक्षेस बसला होतात काय?** होय / नाही.
**होय असल्यास त्याचा तपशील खालीलप्रमाणे**

| **अ.क्र.** | **परीक्षेचे वर्ष** | **संधी क्रमांक** | **केंद्र** | **आसन क्रमांक** | **शेरा** |
|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | |
| २ | | | | | |
| ३ | | | | | |

८. **स्था.अ.स.परीक्षेत म.अ.प्र.प्र. नाशिक कडून परीक्षार्थीस सुट मिळालेले विषय व त्या विषयात मिळालेले गुण:-**

**(निकालपत्राची प्रमाणित छायांकित प्रत जोडणे अनिवार्य)**

| विषय | गुण | विषय | गुण | विषय | गुण |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

**९. परीक्षार्थीस ज्या विषयांच्या परीक्षेस बसावयाचे आहे, त्या विषयांची नांवे:-**

| अ.क्र. | विषयाचे नाव | अ.क्र. | विषयाचे नाव |
|---|---|---|---|
| १ | | ५ | |
| २ | | ६ | |
| ३ | | ७ | |
| ४ | | ८ | |

**१०. परीक्षेसाठीचे इच्छित केंद्र: (प्रवेश अर्ज भरण्यासाठीची सूचना क्रमांक ५ पहावे)**

**सहपत्र:** १) स्वत:चे नाव, पत्ता व पोष्टाचे
रु.१०/- चे तिकीट लावलेला लिफाफा (२२.५ X १० से.मी.)
२)
३)
४)

आपला / आपली विश्वासू,

(उमेदवाराची सही )

नाव:-

दिनांक: ठिकाण: पदनाम:

**११. नियंत्रक अधिकारी यांनी प्रबोधिनीस सादर करावयाचे प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते की -

१. परीक्षार्थी श्री./श्रीमती/कुमारी ________________________________________________
यांची प्रथम नेमणूक ________________________ या पदावर झाली असून त्यांचे सध्याचे पद ______________________ असून ते या पदावर दि. ________________ पासून कार्यरत आहेत.

२. परीक्षार्थीने अर्जात भरलेल्या सर्व संबंधित बाबींची पडताळणी सेवा पुस्तकावरुन / त्याच्या मुळ कागदपत्रावरुन केली असून ती बरोबर आहे.

३. स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक परीक्षेसाठीच्या नियमावलीनुसार परीक्षार्थी स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक अर्हताकारी / विभागीय परीक्षेस बसण्यास पात्र ठरण्यासाठी आवश्यक असलेल्या शैक्षणिक / पात्रता विषयक अटी पूर्ण करीत असल्याने त्याला नोव्हेंबर २००९ मधील परीक्षेसाठी प्रवेश देण्यास शिफारस करण्यात येत आहे.

दिनांक:
ठिकाण:

**अधीक्षक अभियता यांची स्वाक्षरी व शिक्का**

**प्रबोधिनीने दिलेला आसन क्रमांक:** [ ]

**उपसंचालक (व्या.प.)**
म.अ.प्र.प्र., नाशिक.

********

# परीक्षेचे प्रवेश पत्र

क्रमांक मअप्रप्र/स्थाअस/व्याप/प्रवेशपत्र/ /२००९

महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी
दिंडोरी मार्ग, नाशिक ४२२ ००४
दिनांक :

प्रति,
श्री. ----------------------------------------------
------------------------------------------------
------------------------------------------------
------------------------------------------------

**पासपोर्ट आकाराचा फोटो लावावा व का.अ./ अ.अ. यांनी प्रमाणित करावा.**

(परीक्षार्थीने स्वतःचे हस्ताक्षरांत संपूर्ण पत्ता पिनकोडसह लिहावा.)

**विषय : स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक यांच्या सन २००९ च्या अर्हताकारी / विभागीय परीक्षेचे प्रवेश पत्र.**

**दिनांक २३/११/२००९ ते २८/११/२००९** या कालावधीत होणा-या स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक यांच्या अर्हताकारी व्यावसायिक परीक्षेला बसण्यासाठी आपणांस परवानगी देण्यात येत आहे.

**परीक्षार्थी आसन क्रमांक** (परीक्षार्थीने उत्तरपत्रिकेवर सदर आसनक्रमांक लिहावयाचा आहे.)

१) **परीक्षा केंद्र व ठिकाण पत्ता:**

२) **समन्वय अधिका-यांचा नांव व पत्ता:** .

२) परीक्षेचे वेळापत्रक:

| वार | दिनांक | वेळ (कालावधी) | विषय |
|---|---|---|---|
| सोमवार | २३/११/२००९ | १०.०० ते १३.०० | गणितशास्त्र आणि यंत्रशास्त्र **(लेखी)** |
| | | १४.३० ते १७.३० | सर्वेक्षण **(लेखी)** |
| मंगळवार | २४/११/२००९ | १०.०० ते १३.०० | आरेखन आणि प्राक्कलन **(लेखी)** |
| | | १४.३० ते १७.३० | आरेखन - प्रात्यक्षिक |
| बुधवार | २५/११/२००९ | १०.०० ते १०.३० | बांधकाम आणि बांधकाम सामग्री **(मौखीक)** |
| | | ११.०० ते १३.३० | बांधकाम आणि बांधकाम सामग्री **(लेखी)** |
| गुरुवार | २६/११/२००९ | १०.०० ते १३.०० | सर्वसाधारण स्थापत्य अभियांत्रिकी **(लेखी)** |
| शुक्रवार | २७/११/२००९ | १०.०० ते १०.३० | बांधकाम व्यवस्थापन आणि बांधकामे व भांडारलेखे् **(मौखीक)** |
| | | ११.०० ते १३.३० | बांधकाम व्यवस्थापन आणि बांधकामे व भांडारलेखे् **(लेखी)** |
| शनिवार | २८/११/२००९ | ९.०० ते १०.०० | सर्वेक्षण **(मौखीक)** |
| | | १०.०० ते १२.०० | सर्वेक्षण (प्रात्यक्षिक) |

**परीक्षार्थींची स्वाक्षरी** **उ.अ./का.अ. यांची सही व शिक्का** **उपसंचालक (व्या.प.)**
**म.अ.प्र.प्र. नाशिक.**

## ३.० परीक्षार्थींसाठी विशेष सूचना:

१.० परीक्षाथीने परीक्षेच्या वेळेपूर्वी कमीत कमी १० (दहा) मिनिटे अगोदर परीक्षा कक्षांत उपस्थित असणे जरुर आहे. परीक्षा सुरु झाल्यानंतर अर्ध्या तासानंतर येणा-या उमेदवारांस परीक्षेस उपस्थित राहण्यांस परवानगी देण्यांत येणार नाही.

२.० परीक्षार्थींनी परीक्षेसाठी लागणारे सर्व साहित्य उदा. पेन, पेन्सिल, रबर ड्राईंग बोर्ड व इतर आवश्यक साहित्य स्वत: आणावयाचे आहे. परीक्षा समन्वय अधिका-यांकडून वरील साहित्य पुरविले जाणार नाही.

३.० परीक्षार्थीने या पत्रावरील खाली दिलेल्या रकान्यात स्वत:ची सही आपले वरीष्ठ राजपत्रित अधिका-यांकडून प्रमाणित करुन आणावी. त्या शिवाय परीक्षा केंद्रावर प्रवेश दिला जाणार नाही.

४.० परीक्षेस येतांना हे प्रवेशपत्र सोबत आणावे व समन्वय अधिकारी किंवा त्यांचा प्रतिनिधी ज्या ज्या वेळी मागतील त्या त्या वेळी दाखवावे.

५.० परीक्षार्थींनी कुठलाही थेट पत्रव्यवहार महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनीशी करु नये. असा पत्रव्यवहार करणा-याची गंभीर दखल घेण्यांत येईल.

६.० प्रवेशपत्र परीक्षेचा निकाल लागून त्याची सेवापुस्तकात नोंद होईपर्यंत जपून ठेवावे. याची दुसरी नक्कल प्रत मिळणार नाही.

***********

**स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक पदावर सामावून घेण्यासाठी अर्हताकारी / विभागीय परीक्षा सन २००९.**

# : परीक्षेचे वेळापत्रक :

| वार | दिनांक | वेळ (कालावधी) | विषय |
|---|---|---|---|
| सोमवार | २३/११/२००९ | १०.०० ते १३.०० | गणितशास्त्र आणि यंत्रशास्त्र **(लेखी)** |
| | | १४.३० ते १७.३० | सर्वेक्षण **(लेखी)** |
| मंगळवार | २४/११/२००९ | १०.०० ते १३.०० | आरेखन आणि प्राक्कलन **(लेखी)** |
| | | १४.३० ते १७.३० | आरेखन - प्रात्यक्षिक |
| बुधवार | २५/११/२००९ | १०.०० ते १०.३० | बांधकाम आणि बांधकाम सामग्री **(मौखीक)** |
| | | ११.०० ते १३.३० | बांधकाम आणि बांधकाम सामग्री **(लेखी)** |
| गुरुवार | २६/११/२००९ | १०.०० ते १३.०० | सर्वसाधारण स्थापत्य अभियांत्रिकी **(लेखी)** |
| शुक्रवार | २७/११/२००९ | १०.०० ते १०.३० | बांधकाम व्यवस्थापन आणि बांधकामे व भांडारलेखे् **(मौखीक)** |
| | | ११.०० ते १३.३० | बांधकाम व्यवस्थापन आणि बांधकामे व भांडारलेखे् **(लेखी)** |
| शनिवार | २८/११/२००९ | ९.०० ते १०.०० | सर्वेक्षण **(मौखीक)** |
| | | १०.०० ते १२.०० | सर्वेक्षण **(प्रात्यक्षिक)** |

**उपसंचालक (व्या.प.)**
महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी
नाशिक.